मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५२ पोटकलम १ प्रमाणे इमारतीचे
बांधकाम करणेस द्यावयाचा परवाना दाखला

# ग्राम पंचायत कारीवली, ता. भिवंडी, जि. ठाणे.

(शिक्का: ४४६ २५/५/१०)

दिनांक : २५/५/२०१०

जा.न./ग्रा.प.का./वशी

श्री. चिराग जगदीश भाट ---- रा. कारीवली जि.ठाणे

यासी कळविण्यात येते की, मौजे-कारीवली, ता. भिवंडी, जि.ठाणे, येथील जुने घर क्र. —
सर्व्हे न. ३५/३/१ ३३/३ व ३४/१ / गावठाण सिटी सर्व्हे न. — चा ३९९९.४५ क्षेत्रफळाच्या भुखंडावरील
३५/३, ४/१ व ४०/२ ५८/३ बांधकाम करणे बाबतचा/ दुरुस्ती करणे बाबतचा दि. ११ / २ /२०१० चा अर्ज दि. २२ / २ /२०१० रोजी मिळाला. सदर अर्जावर ग्रामपंचायत सभा दिनांक ०२ / ३ /२०१० मध्ये विचार विनिमय करून ठराव क्र ०७/६ ने शासकीय खात्याच्या परवानगीस आधीन राहून, उपरोक्त अर्जानुसार खालील अटी/ शर्तीवर बांधकाम करण्यास हे ''ना हरकत परवाना'' पत्र देण्यात येत आहे.

१. मुंबई ग्रा.पं. अधिनियम १९५८ कलम ५२ पोट कलम ३ अन्वये परवानगी मिळाल्यापासून १ वर्षाचे आंत बांधकामास सुरुवात करावी तसेच पोटकलम ४, ५, ६ च्या तरतूदीचे अनुपालन करणे आपलेवर बंधनकारक राहील.

२. बांधकाम करणेपूर्वी आवश्यक असलेली महसूल खात्याची परवानगी घेणे आवश्यक असून स.नं.चा. जागा एन.ए. (अकृषक) झाल्याशिवाय बांधकामास सुरवात करुन नये.

३. कलम ५३ च्या तरतुदीचे संपूर्ण बंधन आपल्यावर राहील. त्यानुसार सांडपाण्याची योग्य व्यवस्था करणे. तरोच क्र./ व्ही.पी.एम्./२६९०/२८६५/प्र.क्र.३४३५/२२ ग्रामविकास विभाग/ मंत्रालय १० जुलै १९९२ प्रमाणे शौचालय/व सांडपाणी पक्के गटार नसल्यास रस्त्यावर आणता येणार नाही. सांडपाण्याची व्यवस्था [illegible] करणे राहील

४. जागेच्या मालकी, वहीवाट संबंधी हरकत वा वाद निर्माण झाल्यास परवानगीस स्थगीती दिली जाईल व जोपर्यंत वाद मिटत नाही. तोपर्यंत स्थगीता कायम राहील. सदर वादाचे निराकरण अर्जदाराने करावयाचे असून निराकरण झालेनंतर पंचायतीस कळविले पाहिजे व स्थगीती रद्द करणेबाबत परवानगी घेतलेशिवाय बांधकाम करता कामा नये.

५. होणारे सर्व बांधकाम आपले मालकीच्या व वहीवाटीच्या जागेत करावयाचे असून छपराचे पडणाऱ्या पाण्यापासून कोणास त्रास होणार नाही याची दक्षता घेणेत यावी.

६. महाराष्ट्र रिजनल प्लॅनीग ॲक्ट व महाराष्ट्र महसूल कायदा यामध्ये असलेल्या तरतुदी प्रमाणे इमारत बांधकाम सुरु करणेपूर्वी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण संकुलन रचना कार्यालय (टाऊन प्लॅनिंग) ठाणे यांचे कार्यालयाकडून इमारत बांधकामाचे प्लॅन मंजूर झाल्याशिवाय बांधकामास सुरुवात करता कामा नये.

७. इमारताच्या आजूबाजूस प्लॅनमध्ये दाखविल्याप्रमाणे मोकळी जागा न सोडल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' रद्द करणेचा अधिकार ग्रा. पं. ने राखून ठेवलेला आहे.

८. बांधकाम करतांना, बांधकामासाठी वापरले जाणारे मटेरिअल अगर सामान यापासून नागरीकांच्या रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही, याची खबरदारी अर्जदार यांनी घ्यावयाची आहे.

९. इमारतीचे सांडपाणी, व सेप्टीक टँक मधून येणारे सांडपाणी याची व्यवस्था अर्जदार यांनी स्वतः करावयाची आहे.

१०. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर व सदरची इमारत निवासासाठी/ व्यापारासाठी वापराकरीता योग्य असल्याबाबत वास्तुविशारद यांचा दाखला ग्रा.पं. ला सादर केल्याशिवाय या इमारतीचा कुठल्याही प्रकारे वापर होणार नाही याची खबरदारी अर्जदार यांनी घ्यायची आहे.

११. इमारतीचे बांधकाम करतांना कुठल्याही प्रकारचा गंभीर अपघात झाल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी अर्जदार यांचेवर राहील.

१२. इमारतीचा वापर गोडाऊन म्हणून करावयाचा असल्यास अग्निशमन अधिकारी यांचेकडून ''गोडावूनसाठी योग्य'' असा दाखला प्राप्त झाल्याशिवाय इमारतीचा वापर करु नये.

१३. बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी सात दिवस आगाऊ बांधकाम केव्हा सुरु करणार याबाबत लेखी ग्रा.पं. कार्यालयात कळवावे.

१४. परवानगीचे तारखेपासून एक वर्षाचे आत बांधकामास सुरुवात करावी. तशी सुरुवात न केल्यास सदर परवानगी रद्द समजावी व नविन परवानगीसाठी अर्ज दाखल करावा.